

# आधुनिक भारताचा इतिहास

(सन : १७५७ ते १८५७)

प्रा. आनंद काळबांडे | डॉ. सर्जेराव भामरे

## प्लाशीच्या लढाईची कारणे किंवा पार्श्वभूमी

ब्रिटिशांनी भारतात साम्राज्यविस्तार करण्यासाठी युद्ध व राजनितीचा अवलंब केला. बंगालमध्ये इंग्रज, फ्रेंच व डच यांच्या वखारी होत्या. परंतू त्यात सर्वात समृद्ध इंग्रजांच्या वखारी होत्या. बंगालमध्ये इंग्रजांची आर्थिक हीतसंबंध गुंतलेले होते. त्यातून संघर्षाची परिस्थिती निर्माण होऊन बंगालचा नवाब सिराजउददौला व इंग्रज ईस्ट इंडिया कंपनी यांच्यात २३ जुन १७५७ रोजी बंगालमध्ये प्लाशी येथे लढाई झाली. त्या लढाईची कारणे किंवा कारणीभूत परिस्थिती पुढील प्रमाणे.

### १) व्यापारी परवान्याचा दुरुपयोग -

इ.स. १७१७ मध्ये मुघल बादशहा फर्रुखासियरने ०३ हजार रुपये कराच्या मोबदल्यात ईस्ट इंडिया कंपनीला जकात कर न भरता बंगालमध्ये मालाची ने आण करण्याची (कर मुक्त व्यापाराची) सनद देण्यात आली होती. परंतु कंपनीचे अधिकारी व कर्मचारी कपंनीला मिळालेल्याव वरील अधिकाराचा उपयोग बेकायदेशीर करु लागलेत. स्वत:च्या फायद्यासाठी त्यांनी या परवान्याच्या सहाय्याने खाजगी व्यापार सुरु केला. त्यांनी 'परवानगी-पत्र' व 'दस्तक' हे अधिकार-पत्र भारतीय व्यापाऱ्यांनाव आपल्या सेवेतील कर्मचाऱ्यांना विकणे सुरु केले. त्यातून वैयक्तिक पैसे कमवायला सुरुवात केली. त्या पत्राच्या आधारे भारतीय व्यापारी देखील जकात न भरता व्यापार करु लागले. कंपनीच्या वर्चस्वाखाली असलेल्या कलकत्त्यात आयात होणाऱ्या भारतीय मालावर कंपनीने जबर जकात बसविली. कंपनीच्या गैरव्यवहाराचा राग नवाब सिराजउददौला यांना आला. त्या व्यवहारावर बंधने लादण्यचा प्रयत्न केला. त्यामधून प्लाशीची लढाई घडून आली.

## २) वखारी भोवतीच्या तटबंदीचा प्रश्न -

याचवेळी इंग्रज आणि फ्रेंच यांच्यात युरोपमध्ये सप्तवर्षीय (इ.स. १७५६- इ.स. १७६३) युद्ध सुरु झाले. त्याचा परिणाम भारतातील इंग्रज-फ्रेंच कंपन्यावरही पडला आणि आक्रमण झाल्यास संरक्षणासाठी कलकत्ता व चंद्रनगर येथील त्यांच्या वखारीभोवती तटबंदी उभारण्यास सुरुवात केली. (नवाबाची परवानगी न घेता) तसेच किल्ल्याची डागडुजी व शस्त्रसज्ज करण्यास प्रारंभ केला. नवाबाला ते आवडले नाही. ती तटबंदी पाडून टाकण्याचा आदेश दिला. फ्रेंचानी त्या आदेशाचे पालन केले. पण इंग्रजांनी तो आदेश धुडकावून लावला. त्यामुळे सिराजउददौला आणि इंग्रज यांच्यात संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली व प्लाशीची लढाई घडून आली.

## ३) इंग्रज व शौकतजंग संबंध -

अलीवर्दीखानला मुलगा नव्हता तीन मुलीच होत्या. सिराजउददौला हा धाकट्या मुलीचा मुला नवाब बनल्यानंतर इतर दोन मुली व त्यांची मुले नाराज झाली. त्यातील शौकतजंग प्रतिस्पर्धी होता. इंग्रजांनी शौकतजंगला पाठींबा देऊन सिराजउददौलास त्रास देण्यास सुरुवात केली. त्यातून प्लाशीची लढाई घडून येण्यास कारण ठरले.

## ४) कृष्णवल्लभ प्रकरण -

नवाबाच्या सेवेत असलेल्या श्रीमंत व्यापारी कृष्णवल्लभने चुकीचे हिशेब ठेऊन फार मोठ्या प्रमाणात पैशाची अफरातफर केली होती. त्यामुळे नवाबाची त्याच्यावर गैरमर्जी झाली. दंडादाखल नवाब कारवाई करील या धाकाने गैरमार्गाने गोळा केलेला सर्व पैसा घेऊन खजिन्यासह आपल्या कुटूंबियांना घेऊन कृष्णवल्लभ कलकत्ता येथे इंग्रजांच्या आश्रयाला गेला. नवाबाविरुद्ध कंपनीने त्याला संरक्षण द्यावे हे सिराजउददौलास सहन झाले नाही. कृष्णवल्लभला आपल्या स्वाधीन करावे अशी नवाबाने मागणी केली. ती इंग्रजांनी धुडकावून लावली. त्यामुळे नवाब-इंग्रज संबंध जास्तीच बिघडले व प्लाशीची लढाई होण्यास कारण ठरले.

## प्लाशीची लढाई (२३ जुन १७५७)

नवाबाने अलीनगरच्या तहाचा-भंग केला असा खोटा आरोप इंग्रजांनी लावला. त्यावर प्रतिउत्तर येण्याच्या अगोदरच क्लाईव्ह तीन हजार युरोपीयन फौज घेऊन त्यात ९५० युरोपीयन पायदळ, १०० युरोपियन तोफा व २१०० भारतीय सैनिकांच्या मदतीने सिराजउददौला विरोधी आक्रमणास गेला. सिराजउददौला ५०,००० च्या फौजेसह इंग्रजांना तोंड देण्यास तयार झाला. २३ जुन १७५७ रोजी सिराजउददौला आणि ब्रिटिशांचे सैन्य प्लाशी येथे एकमेकांसमोर आले. प्लाशीच्या रणमैदानावर सिराजउददौलांच्या तोफांच्या धडाक्याने लढाईला सुरुवात झाली. नवाबाचे विशाल सैन्य बघुन इंग्रजांच्या उरात धडकीच भरली. युद्धाला सामोरे न जाता माघारी फिरावे अशा मनस्थितीत क्लाईव्ह होता. कारण पराभव झालातर बंगालमधुन इंग्रजांचे समुळ उच्चाटन होईल ही भिती होती. त्याचा परिणाम दक्षिणेतही इंग्रजावर होईल. क्लाईव्ह युद्धातील दोलामय मन:स्थितीत असताच मीरजाफर कडून एक पत्र मिळाले. नवाबाच्या फौजेचा फारमोठा हिस्सा

# २ भारतात ब्रिटीश सत्तेची स्थापना

## राबर्ट क्लाईव्ह

राबर्ट क्लाईव्ह यांचा जन्म इ.स. १७२५ मध्ये इंग्लडच्या एका खेड्यात झाला. तो ईस्ट इंडिया कंपनीमध्ये कारकुन म्हणून कामाला लागला व भारतात आला. दक्षिण भारतात त्याने कारकुनी सोडून १७५१ मध्ये सैन्यात नोकरी धरली. अर्काटचा विजय, कलकत्त्यावर पुन्हा ताबा, चंद्रनगर जिंकणे, प्लाशीमधील विजय या यशामुळे त्याला भारतातील ब्रिटिश साम्राज्याचा संस्थापक म्हणतात.

प्लाशीच्या विजयानंतर कंपनीने त्याला बंगालचा गव्हर्नर बनविले. तो या पदावर १७५७ ते १७६० पर्यंत होता. त्याला पैसे लुटायची व भेट म्हणुन सतत काहीतरी घेत राहायची सवय होती. मीर जाफर व दिवाण दुर्लभराय आणि रामनारायण यांच्यात मध्यस्थी करण्याबद्दल बिहारमध्ये व्यापारावर एकाधिकार मिळवला. मुघल राजकुमार अलील गौहर व मीर जाफरचा मुलगा मीरन यांच्यातील लढाईत क्लाईव्ह हा सैन्यासह मीर यास मदत करण्यास गेला होता. त्यचा मोबदला म्हणून त्याने कलकत्त्याजवळ एक जहागीरी मिळविली. त्या जहागिरीतील उत्पन्न (वार्षिक) तीस हजार पौंड होते.

क्लाईव्हने बंगालमध्ये गंगेच्याकाठी बिडुरा येथे कर्नल फोर्डच्या सहकाऱ्याने डचांचा पराभव केला. कर्नाटकाच्या तिसऱ्या लढाईवेळी फ्रेंच सेनापती काऊँटलाली याने इंग्रजावर आक्रमण करण्यासाठी बुसी या फ्रेंच सेनापतीला हैद्राबादवरुन बोलाविले तेव्हा क्लाईव्हने कर्नल फोर्ड याला पाठवून फ्रेंचाच्या ताब्यातील उत्तर

माझ्या नेतृत्वाखाली असुन युद्धात तो निष्क्रिय राहील असे आश्वासन मिळाले. तसेच दुसऱ्या पत्रात नवाबाच्या लष्करी हालचालीची माहिती मिळाली. ठरल्याप्रमाणे मिरजाफर तटस्थ राहीला. मीरजाफर व रायदुर्लभ विश्वासघात करीत आहेत हे नवाबाच्या लक्षात आले. नवाबाचे बरेच सैन्य त्या दोघांच्या नेतृत्वाखाली होते. लष्कराचा द्रोह पाहुन नवाबाचा धीर खचला. तेवढ्यात नवाबाकडचा मीर मदान ब्रिटिशांच्या गोळीला बळी पडला. तेव्हा सिराजउदौलाचा सेनापती मीर जाफर याने नवाबालाच जीव वाचविण्यासाठी मुर्शिदाबादकडे पळुन जाण्याचे सुचविले. नवाबाने रणक्षेत्र सोडले. नवाबाचा सेनापती मीर जाफर हा लढाईचे केवळ नाटक करु लागला. प्लाशी येथे फारसे युद्ध न होताच बंगालच्या नवाबाचा पराभव झाला. फारशे न लढताच क्लाईव्ह विजयी झाला. क्लाईव्हने कोणतेही शौर्य न करता विश्वासघाताने लढाई जिंकली. इंग्रजांकडील २९ तर नवाबाकडील ५०० माणसे लढाईत मारल्या गेलीत. नवाबाशी निष्ठा असलेल्या थोड्या सैनिकांनी इंग्रजीना थोडाफार प्रतिकार केला.सिराजउददौल पळून मुर्शिदाबादला गेला तेथुन पाटण्यास गेला परंतु त्याला पकडण्यात आले. (२५ जुन १७५७) काही दिवसानंतर मीर जाफरचा मुलगा मीरन यांनी सिराजउददौलास ठार.मारले व कटातील शेवटचा काटा कायमचा काढून टाकला. कराराप्रमाणे क्लाईव्हने मीर जाफरला २८ जुन १७५७ रोजी बंगालच्या नवाब पदावर नियुक्त केले.

सरकार या नावाचा समुद्रतटावरील प्रदेश जिंकुन घेतला. सलाबतजंग या निजामाने क्लाईव्हशी तह केला. इ.स. १७६० मध्ये प्रकृती अस्वास्थामुळे क्लाईव्ह इंग्लडला परत गेला. त्यांनी तीन वर्षाच्या गव्हर्नरपदाच्या काळात कंपनीचा भरपुर फायदा करुन दिला व वैयक्तिक फायदाही खुप करुन घेतला.

बक्सारच्या लढाईनंतर दुसऱ्यांदा बंगालचा गव्हर्नर म्हणून क्लाईव्हला पद देण्यात आले. कारण तो इंग्लडला गेल्यानंतर कंपनीच्या कर्मचाऱ्याचे लाच व भेटवस्तु घेण्याचे प्रमाण फार वाढले होते. वस्तुत: ही सवय क्लाईव्हने आपल्या अनुकरणाने लावली होती. त्यामुळे १७६० ते १७६५ या पाच वर्षाच्या कालावधीतम कंपनीत चोहोकडे अराजकता पसरली होती. अशा परिस्थितीत कंपनीच्या संचालकांनी क्लाईव्हला १७६५ मध्ये दुसऱ्यांदा कंपनीचा बंगालचा गव्हर्नर म्हणुन पाठविले. त्यानंतर तो दोनवर्ष बंगालचा गव्हर्नर राहीला.

मराठ्यांच्या सततच्या स्वाऱ्या होणारा अवध प्रदेश कंपनीच्या प्रदेशात सामिल न करता त्या प्रदेशाचा अधिकार शुजाउददौला यांच्याकडेच ठेवण्यात आला. बक्सार लढाईनंतर बंगाल, बिहार व ओरिसा राज्याची दिवाणी मिळवली. प्रशासनातील लाचलुचपत, कर्मचाऱ्याचा वैयक्तीक व्यापार यावर बंधने लादलीत. क्लाईव्ह-फॅड स्थापन करुन कंपनीचे कर्मचारी सेवा करतांना मृत्यु पावल्यास त्यातुन मदत मिळाली. सैनिकाला मिळणारा डबलचा भत्ता बंद केला.

ब्रिटिश राज्याची सेवा करण्यात व भारतात ब्रिटिश साम्राज्याची सत्ता स्थापण्यात क्लाईव्हचे योगदान फारमोठे आहे. डुप्लेच्या सर्व योजना त्यांनी धुळीस मिळविल्यात. जनरल लॉरेन्स कडून त्याने युद्ध विद्या हस्तगत केली तर साण्डर्सकडून त्याने कुटनितीचे पाठ गिरविले. क्लाईव्ह हा भारतातील इंग्रजी साम्राज्याचा संस्थापक होता. भ्रष्टाचार, दमन व कुशासन व्यवस्था याचे महत्त्वाचे एक कारण म्हणजे क्लाईव्ह हा स्वत:च होय. त्यामुळेच बंगालची प्रजा अनेक वर्षापर्यंत हाल अपेष्टेने जिवन जगत होती. क्लाईव्हच्या धनलालसेमुळे बंगालचा घात झाला. खोटेनाटे करुन दंगाफसाद करुन त्यांनी अमाप पैसा लुटला. क्लाईव्ह अत्यंत लोभी होता. त्यामुळे त्याने आपल्या सिद्धान्ताची तिळमात्र पर्वा केली नाही. यामुळे इतिहासकार त्याची प्रशंसा करु शकत नाहीत. वयाच्या ३४ व्या

## बंगालमधील दुहेरी राज्यव्यवस्था

इ.स.१७६५ पासून ईस्ट इंडिया कपंनी बंगालची खरी सत्ताधिश बनली. प्रांतातील लष्करी सामर्थ्य कंपनीकडे तसेच राजकीय सत्ताही कंपनीच्या हाती होती. परंतु प्रशासनाची जबाबदारी पार पाडण्यासाठी लागणारी शासकीय यंत्रणा कंपनीजवळ नव्हती. तेवढा अनुभवही नव्हता. मिळालेले अधिकार प्रत्यक्ष कंपनीच्यावतीने वापरण्याऐवजी नवाबाच्यावतीने वापरण्याचा निर्णय क्लाईव्ह यांनी घेतला. यासाठी बंगालमध्ये "दुहेरी न्यायव्यवस्था" (द्विदल शासन पद्धती) सुरु केली. यालाच क्लाईव्हची दुहेरी राज्यव्यवस्था असे म्हणतात. ही राज्यव्यवस्था १७६५ ते १७७२ पर्यंत चालली.

नवाबाला जबाबदार असे दोन नायब दिवाण नेमुन क्लाईव्हने त्यांच्यावर कंपनीसाठी सारा वसुल करण्याची जबाबदारी सोपविली. म्हणजेच दिवाण म्हणून त्या प्रांताचा सर्व महसुल कंपनी गोळा करी. दिवाणी अधिकार कंपनीने स्वत:कडे ठेवले आणि प्रांताच्या प्रशासनाची जबाबदारी नवाबावर ठेवली. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या जबाबदारीशिवाय प्रांताची सर्व सत्ता कंपनीच्या हातात आली. त्यातुन प्रांताचे सर्व उत्पन्न नवाब व त्यांचे अधिकारी यांच्यावर प्रशासनाची शांतता व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी होती. ती पारपाडण्यासाठी लागणारी सत्ता किंवा सामर्थ्य किंव पैसा त्यांच्या हाती उरला नव्हता. म्हणुन दुहेरी राज्यव्यवस्था कंपनीला अत्यंत उपकारक ठरले असे म्हणता येईल. धुर्त क्लाईव्हनी या पद्धतीतून सुरक्षा व दिवाणी दोन्ही विभागाचे वर्चस्व स्वत:च्या फायद्यासाठी आपल्याकडे घेतले तर राज्यात शांतता, कायदा-व्यवस्था, न्याय, पोलीस इत्यादी बाबी नवाबाकउेच राहु दिल्यात. कंपनीला फक्त तेथील सरकारवर आपले नियंत्रण हवे होते. ते क्लाईव्हने दुहेरी राज्यव्यवस्थेत पूर्ण केले.

लोकांना नवाब गादीवर दिसत होता. प्रत्यक्ष राज्यकारभार बंगालचा नवाब करीत होता. दोष किंवा उणीवा बाबत जनता नवाबालाच सरकार प्रमुख

म्हणुन जबाबदार धरत होती. परंतु त्यांच्याकडे महत्त्वाचे अधिकार नव्हते. तर शासनाचे सर्व लाभ अलगदपणे कंपनीच्या झोळीत पडत होते. जबाबदारीशिवाय सत्ता कंपनीच्या हाती तर सत्तेशिवाय शासनाची पूर्ण जबाबदारी नवाबावर अशी परिस्थिती दुहेरी शासनव्यवस्थेने निर्माण केली. कर वसुल करण्याचा आर्थिक व्यवहार कंपनीकडे होता. त्यामुळे जमा झालेल्या पैश्यातुन मुघल सम्राट व नवाबाचे पेन्शन आणि निजामतीचा खर्चही केल्या जात होता. शिल्लक राहीलेली रक्कम कंपनीला जात होती. या व्यवस्थेत नायब दिवाणाच्या नियुक्ती व पदच्युतीचे सर्व हक्क कंपनीकडेच होते. बंगालच्या प्रशासनासंबंधी दिवाणी व निजामत असे दोन प्रमुख अधिकार नवाबाला होते तर १२ ऑगस्ट १७६५ मध्ये मुघल बादशहा शहाअल्लमने अलाहाबादच्या तहाने दिवाणी अधिकार ईस्ट इंडिया कंपनीस दिले. पुढे जेव्हा अल्पवयीन नवाब गादीवर आल्यानंतर त्याच्या मदतीसाठी उपनवाब नेमण्यात आले. त्या उपनवाबास नेमण्याचा अधिकार कपंनीने स्वत: कडेच घेतला होता. त्यामुळे तर भारतातील सार्वभौम सत्ता म्हणुन कंपनीची भारतात वाटचाल सुरु झाली. त्यासाठी दुहेरी शासनव्यवस्था ब्रिटिशांना बहुमोल मदत करणारी ठरली.

# ३ ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासनातील भारत

## वॉरेन हेस्टिंग्ज (१७७२-१७८५)

क्लाईव्ह इंग्लडला माघारी गेल्यानंतर बंगालचा गव्हर्नर (प्रशासक) म्हणून वॉरन हेस्टिंग्ज भारतात येईपर्यंत मधील पाच वर्षाच्या काळात व्हर्लस्ट (१७६७-६९) आणि कर्टियर (१७६९-७२) असे दोन गव्हर्नर होऊन गेले परंतु दोघेही साधारण कुवतीची माणसे होती. सामान्य कुटुंबात जन्मलेल्या वॉरन हेस्टिंग्जला कंपनीचा संचालक असलेला एका नातेवाईकाने हेस्टिंग्जने वयाची विशिही ओलांडली नव्हती तेव्हा म्हणजेच वयाच्या १८ व्या वर्षी कंपनीच्या सेवेत कारकुन व लेखक म्हणुन भरती केली. काही वर्षानंतर त्याला कासीम बाजारचा रेजीडेंट (ब्रिटिश अधिकारी) म्हणून नेमण्यात आले. जेव्हा सिराउददौला याने कासीमबाजार ताब्यात घेतले होते त्यावेळी वॉरेन हेस्टिंग्ज यालाही कैदेत टाकले होते. पण तो शिताफीने निसटला. हुशारी व कठोर परिश्रमांची क्षमता या गुणांमुळे काही वर्षातच तो १७६१ ला कलकत्ता कौन्सिलचा सदस्य बनला. काही वर्षासाठी तो इंग्लडला परत गेला. तो जेव्हा पुन्हा भारतात आल्यानंतर त्याला मद्रास (चैन्नई) कौंसिलचे सदस्यपद देण्यात आले. सुमारे चौदावर्ष भारतात हलविल्यानंतर १७६४मध्ये नोकरीचा राजीनामा देऊन तो इंग्लडला परत गेला.

परंतु कंपनीच्या कामकाजातील गोंधळातुन मार्ग काढण्याकरीता कुशल व विश्वासु व्यक्तीच्या शोधात असलेल्या कंपनीच्या संचालकांनी बंगालचा गव्हर्नर (प्रशासक) म्हणुन त्याला भारतात पाठविले. एप्रिल १७७२ ला कलकत्ता

# रेग्युलेटिंग ॲक्ट - १७७३

## (भारत नियामक कायदा)

व्यापाराकरीता स्थापन झालेली ईस्ट इंडिया कंपनी बक्सार लढाईनंतर (१७६४) ती भारतातील राजकीय सत्ता (संस्था) बनली. दुहेरी राज्यव्यवस्थेने १७६५ ते १७७२ पर्यंतच्या काळात बेशिस्त, लाचखोर वृत्ती, भ्रष्टाचार, जुलूम व पिळवणूक कंपनीच्या प्रशासनात वाढली. त्याचे पडसाद इंग्लडमध्ये उमटू लागलेत. (दुहेरी राज्य व्यवस्थेवर टिका होऊ लागल्यात.) कंपनीच्या कार्यप्रणालीवर इंग्लड सरकारचे नियंत्रण असावे असा विचार पुढे आला. त्यासाठी पाहणी करण्यासाठी नियुक्त समितीने अहवाल सादर केला. लोकसभेच्या आज्ञेतच कंपनीने व्यवहार करावा हा विचार श्रेष्ठ ठरला. या निमित्ताने ब्रिटिश सरकार व कंपनी सरकार यांच्यातील संबंध निश्चित झालेत. कंपनीवर नियंत्रणासाठी १७७३ ला ग.ज. वारेन हेस्टिंग्जच्या काळात ब्रिटिश सरकारचा नियंत्रण कायदा संमत झाला. त्यालाच रेग्युलेटींग ॲक्ट किंवा नियामक कायदा म्हणुन ओळखतात.

कारभार केला.

## पिट्स इंडिया अ‍ॅक्ट - १७८४

## (पिटचा कायदा)

रेग्युलेटींग अ‍ॅक्ट पारीत केल्यानंतर बरीच वर्ष ब्रिटिश संसलेला कंपनीच्या शासन व्यवहारात लक्षच घालता आले नव्हते. कारण या काळात इंग्रज आणि अमेरिकेतील वसाहतीचे युद्ध सुरु होते. त्यानंतर लोकसभेने संस्थेच्या (कंपनीच्या व्यवहाराची माहीती गोळा करण्यासाठी दोन समित्यांची नेमणुक केली. त्या समित्यांनी दिलेल्या अहवालानुसार रेग्युलेटिंग अ‍ॅक्ट व दुरुस्तीचा कायदा पास होऊनही कंपनीच्या राज्यकारभारात हवी ती सुधारणा झाली नाही. म्हणून इंग्लडचा तत्कालीन पतंप्रधान पिट याने आणखी दुरुस्त्या सुचविणारे एक विधेयक पार्लमेंटमध्ये मांडून ते पास करुन घेतले. रेग्युलेटींग अ‍ॅक्ट मधील अस्पष्टता दुर करण्यासाठी १७८४ मध्ये इंडिया अ‍ॅक्ट बनविण्यात आला. त्याला पिट्चा इंडिया अ‍ॅक्ट किंवा रेग्युलेटिंग अ‍ॅक्टचा सुधारणा कायदा असे म्हणतात. त्यातील तरतुदी खालील प्रमाणे.

१) ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी इंग्लडमध्ये एक सहा सदस्यांचे 'नियामक मंडळ' (बोर्ड ऑफ कंट्रोल) स्थापन करण्यात येईल. या मंडळाकडे महसुल, लष्करी व मुलकी अधिकार देण्यात आले. त्या संदर्भातील सर्व निर्णय मंडळाच्या संमतीने गव्हर्नर जनरलनी घ्यावेत.

२) या सदस्यांचे वतन व खर्च ब्रिटिश पार्लमेंट ठरवेल तो पैसा भारताच्या तिजोरीतुन वसुल व्हावा.

## (अ) कायमधारा पद्धत

इंग्रजांनी भारतातील आपल्या अधिकाराखालील वेगवेगळ्या विभागावर वेगवेगळ्या महसुल पद्धती लावल्या होत्या. त्यापैकी लॉर्ड कॉर्नवालीसने १७९३ मध्ये बंगाल, बिहार व ओरिसात महसुल पद्धतीत सारा वसुलीसाठी कायमधारा (जमिनदारी) पद्धत सुरु केली. सारा वसुलीचे धोरण ठरविण्याच्या कामात कॉर्नवालीसला भारतात कामकरुन अनुभव प्राप्त केलेल्या सर जॉन शोअरची मोठी मदत झाली. सर जॉन शोअर, जोनाथन डंकन व जेम्स ग्रँट यांनी सर्वप्रथम बंगालचा दौरा केला. जमिनीची पाहणी केली. तीन वर्षानंतर त्यांनी प्रतिवेदन सादर केली. (जुन १७८९) त्यानंतर जमिनीवरील कर निश्चित केला. या मदतीतून कॉर्नवालीसने 'कायमधारा पद्धत' सुरु करण्याचा निर्णय घेतला. या पद्धतीस 'जमिनदारी पद्धत' असे म्हटले जाते. २२ मार्च १७९३ पासून बंगाल आणि बिहारसाठी ही योजना लागु करण्यात आली. या पद्धतीस जहागीरदारी तसेच मालगुजारी नावानेही ओळखल्या जाते. कॉर्नवालीसने सुचविलेल्या कायमधारा पद्धतीच्या सुचनेला इंग्लड प्रधानमंत्री विल्यम पीटने, नियंत्रण मंडळाचा अध्यक्ष डंडास यांनी मान्यता दिली.

# ४ ईस्ट इंडिया कंपनी व भारतीय एतद्देशीय सत्ता संबंध

भारतात व्यापार करण्यासाठी आलेली ईस्ट इंडिया कंपनी पुढे राजकीय सत्ताधिश बनण्याचा प्रयत्न करु लागली. त्यात सत्ताविस्तार करण्यासाठी ब्रिटिशांनी प्रथम प्लाशी व बक्सारची लढाई केली. त्यातुन बंगाल प्रांत हस्तगत केला. असा एक-एक प्रदेश जिंकुन घेण्यासाठी कंपनीचे मुख्य अधिकारी गव्हर्नर जनरल यांनी प्रयत्न केलेत. बंगाल नंतर ब्रिटिशांनी आपली नजर दक्षिण भारतातील म्हैसूर या प्रांताकडे वळविली.

## अ) म्हैसुर राज्य / सत्ता –

आजचे कर्नाटक राज्य म्हणजे मध्ययुगीन म्हैसुर राज्य होय. म्हैसुर हा १६ व्या शतकात विजयनगरचा एक भाग होता. विजयनगरच्या अस्तानंतर म्हैसुर एक स्वतंत्र राज्य म्हणून आपले अस्तित्त्व टिकवून होते. स्वतंत्र राज्य म्हणून त्याची निर्मिती झाली. येथे ओडियार घराण्याची सत्ता होती. म्हैसुर राज्याच्या घोडदळातील सैनिक म्हणून हैदरअल्लीनी आपल्या सैनिकी जीवनाचा प्रारंभ केला. हैदरअलीचा उदय ही १८ व्या शतकातील एक महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. इ.स. ७२१ मध्ये बुंदीकोट्याला हैदरअलीचा जन्म झाला होता. साधा शिपाई असलेला हैदरअल्ली अल्पावधीत स्वकर्तृत्वाने कौशल्याच्या जोरावर म्हैसुरच्या सैन्याचा सेनापती बनला. फ्रेंच प्रशिक्षकाकडून हैदरने आधुनिक पद्धतीचे प्रशिक्षणही घेतले.

हैदरअल्ली हा अतिशय महत्त्वाकांक्षी व पराक्रमी होता. लहानमोठ्या